# राजर्षी शाहू: जातीव्यवस्था व अस्पृश्योद्धार

**प्रा. मोहन बाबूराव चव्हाण,** मराठी विभाग, आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,रामानंदनगर (बुर्ली).

**प्रस्तावना**

कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी कागल येथील घाटगे या घराण्यात झाला. शाहूंच्या आई राधाबाईसाहेब व वडील आबासाहेब होते. शाहू राजांचे शिक्षक, मार्गदर्शक, पालक म्हणून स्टुअर्ट मिटफोर्ड फेझर यांची नेमणूक केली होती. शाहू राजे हे प्रकृतीने धिप्पाड, निरोगी वृत्तीचे उदार व सत्यवादी होते. पंधराव्या वर्षी त्यांची उंची ५ फुट ९ इंच आणि वनज १९७ पौंड होते. भरदार छाती बुरूजबंद प्रकृती आणि फेटबाज मर्दानी चाल यामुळे ते उठून दिसत. शाहू महाराज अर्थशास्त्र, कायदा, प्राथमिक विज्ञान आणि इतिहास या विषयाच्या मुळाशी जाऊन अभ्यास केला होता. १ एप्रिल १८९१ या दिवशी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येशी विवाह झाला. शाहू महाराज यांचे बालपणीचे नाव यशवंतराव घाटगे उर्फ आबासाहेब घाटगे यांना चौथे शिवाजींच्या विधवा पत्नी आनंदीबाई राणीसाहेब यांना दत्तक देऊन त्यांना १७ मार्च १८८४ रोजी गादीवर बसविले हेच कोल्हापूरचे राजश्री शाहू महाराज होते. इ.स. १८८५ ते १८८९ मध्ये राजकोट येथील राजकुमार कॉलेजमध्ये प्रशिक्षण प्राथमिक शिक्षक के. बी. गोखले व ए.बी. गोखले होते. शाहू महाराज यांना दोन पुत्र व दोन कन्या होत्या. एक राधाबाई व दुसरी कन्या आऊबाई. तर पहिला पुत्र राजाराम महाराज व दुसरा पुत्र प्रिन्स शिवाजी असे होते. ब्रिटनची महाराणी व्हिक्टोरिया यांनी शाहू महाराजांना जी.सी.एम.आय. हा किताब अर्पण करून गौरव केला. अशा या शाहू महाराज यांनी आपल्या रयतेस लोक कल्याणाची पूर्ण हमी देणारा आपला पहिला जाहीरनामा प्रसिद्ध केला व शाहूंनी सामाजिक, आर्थिक, राजकीय कार्य करण्यास सुरूवात केले.

अस्पृश्यता ही भारताला लागलेली कीड आहे. अस्पृश्यांचे दु:ख व वेदना यांना धार्मिक चौकटीत अर्थ नव्हता. अस्पृश्यतेच्या प्रश्नांकडे हिंदू विचारवंतांनी अनेक दृष्टीने पाहिले. कधी बौद्धिक मंथन करून, कधी भूतदयावादातून तर कधी समाजक्रांतीच्या आभासाला कंटाळून महात्मा फुले व शाहू महाराज यांची भूमिका याहून वेगळी होती. त्यांनी जीविताचा भाग म्हणून या प्रश्नाकडे पाहिले. जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे हे महात्मा फुले यांच्याप्रमाणेच शाहू महाराजांचा आग्रह होता. नागपूर, माणगाव, दिल्ली, नाशिक इ. ठिकाणाच्या भाषणांत त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. भारतीय संस्कृती व राष्ट्रावर जाती व्यवस्थेचा हानीकारक परिणाम होत असल्याने आपल्या देशातील जातीजमातीत असणारे मतभेद व मत्सर जिवंत राहता कामा नयेत असे महाराजांना वाटत होते. म्हणून स्वराज्याचा विचार करतानाही सर्वप्रथम जाती पद्धत झुगारून देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. माणसाला माणूस म्हणून वागविण्यातच खरे स्वराज्य आहे, असे शाहू महाराज यांनी सांगितले. महाराजांनी जातीभेद समुळ नष्ट व्हावयाचा असेल तर वेगवेगळया जातींचे शरीरसंबंध होण्याची व रोटीव्यवहाराची आवश्यकता सांगितली. जातीव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय देशाची प्रगती होणे असंभव आहे.

जातीव्यवस्थेची सर्वाधिक झळ कोणाला बसत असेल तर ती अस्पृश्यांना. शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या विषयी जो विचार मांडला आहे, तो सहानुभूतीपूर्ण नाही तर प्रत्यक्ष कृतीरूप आहे. त्यामुळे अस्पृश्यांना शिष्यवृत्या सनदा देऊन त्यांच्या प्रगतीच्या दिशा त्यांनी स्पष्ट केल्या. अस्पृश्यांसाठी वसतीगृहे स्थापिली. एकाला राज्यातील नगरपालिकेचे अध्यक्षपद दिले. गंगाराम नावाच्या व्यक्तीला हॉटेल काढून दिले व त्याच हॉटेलातील चहा घेतला व लोकांच्या कल्पनांना छेद दिला. वाडयावर पर्सनल डॉक्टर अस्पृश्य नेमले. मातंग जमातीच्या लोकांची वसाहत कोल्हापूरात शाहू मिलजवळ वसविली. शिव्या बेरडयाच्या घरी जेवले. महाराजांनी ऑफिसरांची लाकडे फोडणे व त्यांना वेठीस लावणे या गोष्टी कायद्याने बंद केल्या. महारांना वेठीची हलकी कामे सांगितल्यास सांगणाऱ्या व्यक्तिस कायद्याने दंडपात्र ठरविण्यात आले. अस्पृश्य समाजाला वर आणण्याची जबाबदारी उच्च जातीय हिंदूंची आहे. त्यासाठी अस्पृश्यांनीही स्वत: प्रगतीकडे गेले पाहिजे. व सवर्णीयांनी काही पायऱ्या खाली आले पाहिजे असे शाहू महाराजांनी सांगितले. अस्पृश्य दुबळा आहे. त्याच्या सशक्तांची जबाबदारी उच्च जातीयांची आहे. ही जाणीव महाराजांच्या जवळ होती. शाहू महाराज म्हणतात की, ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर किंवा लेडी डॉक्टरही अगदी अशक्त व दबल्या मुलास पौष्टीक अन्न व औषधे देऊन त्यांची जोपासना सर्वापेक्षा विशेष काळजीने करून त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवितात. त्याचप्रमाणे आम्ही अस्पृश्य मानलेल्या लोकांना वर आणले पाहिजे. कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी जशी इतरांची सहाय्यकृती हवी तशी त्याला आत्मजाणीव ही हवी ही आत्मजाणीव सर्वोद्धाराकडे नेणारी असावी म्हणूनच उच्चजातीयांकडून जशी अस्पृश्योद्धाराची अपेक्षा केली. सर्वोद्धार हे एक सामर्थ्य असते यातनांचा मार्ग असतो. दक्षिणेतील नाडर समाज याच प्रक्रियातून विकासाची वाटचाल करू शकला. महाराजांनी अस्पृश्य कार्यकर्त्यांना आवाहन केले की, त्यांनी आपल्या दिशा आपण निर्माण केल्या पाहिजेत. आज शिक्षणाच्या ज्या सवलती आहेत, त्याचा पुरेपुर लाभ घेतला पाहिजे. अस्पृश्यांना संधी दिल्याशिवाय ते प्रगती करू शकणार नाहीत असा शाहू महाराजांना अतूट विश्वास होता. अस्पृश्यांनी आपण नीच आहोत अस्पृश्य आहोत ही न्यूनगंडाची भावना खणून काढून सामाजिक

प्रतिष्ठा वाढविण्याच्या इष्टतेवर महाराजांनी जोर दिला तो त्यांच्या कर्तृत्वसंपन्नता हेरून तुम्ही बुद्धीमान आहात, त्यागी आहात, शौर्यवान आहात असा त्यांनी त्यांचा गौरव केला. इंग्रजांनी अस्पृश्यांशी कसे वागावे याबद्दल त्यांचे एक धोरण होते. ''आपण आपल्या हक्कास जपले पाहिजे व जेथे जेथे आपल्या सामाजिक व मानवी प्राण्यांना असणाऱ्या नैसर्गिक हक्कांचा प्रश्न येईल तेथे तेथे आपण शहानपणाने प्रेमाने परंतू दृढ आग्रहाने स्थिर राहिले पाहिजे. व आपले हक्क बजाविले पाहिजेत. हे सर्व अत्यंत शहानपणाने पार पाडण्यास आपण सरकारशी सहकार्य करून शांततेचे अवलंब केले पाहिजेत. या विसाव्या शतकात आपली प्रगती करण्याचा मार्ग हा दंगेधोपे व बंडाळी करण्याचा नसून शांततेने व व्यवस्थितरीतीने आपला आपण विकास करून घेणे हा होय.''

१९२२ साली दिल्ली येथील अस्पृश्य परिषदेपुढे शाहू महाराजांनी केलेले भाषण महत्त्वाचे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. सावरकर, गांधी, विठ्ठल रामजी शिंदे या विसाव्या शतकातील विचारवंतांच्या ठिकाणी अस्पृश्यांच्या उद्धाराची कल्पना होती. परंतू ती मर्यादीत स्वरूपात होती. शाहू महाराजांचे चिंतन युगप्रवर्तनाच्या खुणा प्रकट करणारे होते. दिल्ली येथील शाहू महाराजांनी केलेल्या भाषणात शाहू महाराजांनी अस्पृश्यांना उद्देशून त्यांनी जाहीर आव्हान केले.

१) आपणास विनंती आहे की, आनुवंशिकतेने तमुच्यावर लादलेले धंदे सोडून द्या.
२) शिक्षणासाठी संघर्ष करा.
३) सैन्यात भरती व्हा.
४) सरकारी कचेऱ्यात शिरकाव करून घ्या.
५) व्यापारात लक्ष घाला.
६) आपल्या हक्काची जाणीव तीव्रतेने असू द्या.
७) सरकारशी भांडू नका पण शहाणपणाने व प्रेमाने शक्य तेथे आपल्या उन्नतीसाठी सरकारला सहकार्य द्या.
८) स्वावलंबी व्हा.

दि. ३० मे १९२० रोजी नागपूर येथील भाषणात अस्पृश्यतेविषयी राजश्री शाहूंनी आपले विचार स्पष्ट केले. अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेला उद्देशून ते म्हणाले की, अस्पृश्य या शब्दांचा मी धिक्कार करतो. कोणालाही अस्पृश्य हा शब्द वापरणे हे योग्य नाही. आपण सर्वजण या राष्ट्राचे अविभाज्य व संयुक्त भाग आहेत. आपण सर्व बंधू असून आपले धिक्कार समान आहेत. सर्व भारतीय त्यांची कोणतेही जात, धर्म अथवा वर्ण यांचा विचार न करता हिंदू नागरीकच आहोत. जरी धर्म एखाद्या व्यक्तीच्या मताप्रमाणे महत्त्वाचा भाग असला तरी तो धर्म राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात येता उपयोगी नाही.'' ते अस्पृश्यांना सूर्यवंशीय असे म्हणत होते. अस्पृश्यतेला उच्चाटन करण्याचे झाल्यास जातीव्यवस्था नष्ट करावी लागेल असे शाहू महाराजांना वाटत असे. राजश्री शाहू महाराज या मतांचे होते की, जातीव्यवस्थेचे वर्चस्व नाहीसे करण्यासाठी त्यांनी केलेला संघर्षच अस्पृश्यांची परिस्थिती सुधारू शकेल. म्हणून त्यांनी जातीव्यवस्थेला विरोध केला. म्हणजेच सर्वसाधारणपणे आणि ब्राह्मण्यवादाला विरोध केला. त्यांच्या मते, भारतातील जातीव्यवस्थाच इथल्या अन्याय व्यवस्थेचे कारण होते. राजर्षी शाहूंनी जाती व्यवस्थेविरूद्ध अविश्रांत संघर्ष केला. त्यांचे प्रमुख उद्दिष्ट शुद्रांची अज्ञान आणि गुलामगिरीमधून मुक्तता करणे हेच होते. तसेच सामान्यांचे शिक्षण आणि माणूस यांच्यामध्ये जातीने निर्माण केलेले अडथळे मोडीत काढून नष्ट करणे हेच होते. मार्च १९२० रोजी माणगाव येथे झालेल्या परिषदेमध्ये शाहू महाराज म्हणाले होते की, भारत वगळता जगातल्या कोणत्याच देशात जातीव्यवस्था नाही. १८२० मध्ये नाशिक येथे केलेल्या व्याख्यांनात राजर्षी शाहू महाराज जातीव्यवस्थे बद्दलचे त्यांचे विचार स्पष्ट करताना म्हणाले, ''इथे जमलेल्या सर्व जातींच्या नेत्यांनी केवळ त्यांच्या जातीचीच काळजी घेऊ नये तर सर्व जातींची काळजी घ्यावी तसेच जातीव्यवस्था हा आपल्या देशाच्या प्रगतीमधला मोठा अडथळा आहे. म्हणून जातीव्यवस्थेचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. जाती परिषदांचे उद्दिष्टांचे जीतीय व्यवस्था नष्ट करणे हे असावे, जातीव्यवस्था सबळ करणे नसावे.'' जे नेते जातीव्यवस्था जर तिच्यामध्ये जाती विद्वेष नसेल तर स्वीकारार्ह आहे, असे म्हणतात. अशा नेत्यांवर टीका केली. राजश्री शाहू महाराज यांनी असे ठामपणे सांगितले की, केवळ जातीव्यवस्था मोडीत काढल्यानेच आपण एकत्र येऊ शकू. जातीव्यवस्थेवर ती आधारीत आहे. जातीव्यवस्था फेकून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जातीव्यवस्था मानवतेच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधामध्ये आहे. ते म्हणाले तो दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहला जाईल. जेव्हा हजारो वर्षाची जातीव्यवस्था जिची मुळे श्रेष्ठत्वाच्या मानसिकतेवर आणि अमानवी वर्तवणूकीवर आधारलेली आहेत. ते नष्ट होईल. जुलै १९२० मध्ये हुबळी येथे आपले अध्यक्षीय भाषण करीत असताना राजश्री शाहू यांनी जातीव्यवस्थेची अन्यायी जंत्री सादर केली. ते म्हणाले, आपल्या देशाचा विकास हा गतिहीन आहे. कारण परंपरावादी ब्राह्मणमंडळी स्वत:ला श्रेष्ठ समजतात आणि इतरांना अमानवी अर्थातच हीन वागणूक देतात. याच कारणांमुळे आपण विभागलो आहोत. जातीव्यवस्थेमध्ये निर्मूलन व्हायचे असेल तर ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर या दोन वर्गाचे सहकार्य आवश्यक आहे. दि. २७ जुलै १९२० रोजी हुबळी येथे ब्राह्मणेत्तर सामाजिक परिषदेच्या समारोपाच्या

भाषणामध्ये ते उद्‌गारले, ''माझ्या प्रिय बंधूनो एक व्हा जोरदार प्रयत्न करा आणि मानसिक व बौद्धिक गुलामगिरीच्या बेडया तोडून टाका. तुम्हाला पशुप्रमाणे वर्तवणूक देत असलेल्या माणसापासून अधिकार मिळविण्यासाठी लढायला तयार व्हा.'' शाहू महाराज यांनी केवळ जातीव्यवस्थेला विरोध केला असेच नाही तर त्यांनी ही क्रुर अमानवी जातीव्यवस्था संपविण्यासाठी उपाय सुद्धा सुचविले, ते खालीलप्रमाणे.

अ) जन्म आणि संपत्ती यावर आधारलेला सामाजिक स्तर नष्ट झाला पाहिजे.

ब) प्रशासन आणि शासन यांच्या सेवेमध्ये एका विशिष्ट जातीमधील कर्मचारी भरती थांबवली जावी.

क) आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहित केले जावेत.

ड) सर्वांना समान संधी उपलब्ध केली जावी. गुणवत्ता हाच नोकर भरतीचा एकमेव निष्कर्ष असावा ते या विचारांचे होते की, स्मृती अथवा पुराणे यासारख्या शुद्र व अतिशुद्र यांच्यावर निर्बंध लादणाऱ्या पुस्तकांचा धिक्कार करण्यात यावा.

राजर्षी शाहू यांनी त्यांच्या राजकीय कार्यामध्ये अस्पृश्यतेच्या उच्चाटनासाठी अनेक कायदे संमत केले. अस्पृश्यतेचा कलंक नष्ट करण्यासाठी काही खास आज्ञा काढल्या.

१) हुजूर आज्ञा —करवीर इलाक्यात जहागिरी सोडून अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असता, त्या येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळातून इतर लोकांच्या मुलाप्रमाणेच दाखल करून घेत जावे सरकारी शाळातून शिवाशिव पाळण्याचे नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलास एकत्र बसविण्यात येत जावे.

२) विद्या खात्याने अस्पृश्यांना कशा रीतीने वागवावे हा १५ माहे जानेवारी सन १९१९ ला झालेला हुकूम — हुजुरांच्या असे पाहण्यात आले की, अस्पृश्यांना शाळा खात्यात वेगळेपणाने वागणूक दिली जात असे. सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिलेल्या नसून अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नाही. शिक्षणसंस्था गरीब लोकांकरीता असून गरिबातील गरीब जे अस्पृश्य आहेत त्यांना समतेच्या पायावर वागविणे. ते कर देतात. शाळा खात्यातील खाजगी व सरकारी संस्थांना ग्रॅंड इमारती प्लेग्राउंड वगैरे रूपाने मदत मिळते ते स्पृश्यांपेक्षा अस्पृश्यांना आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्या शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात. परंतू ते अस्पृश्यांना शक्य नाही. अस्पृश्यांना समतेने वागविले नाही तर प्राध्यापक अगर शिक्षक असो त्याला जाब द्यावा लागेल आणि खाजगी संस्थांची मदत काढून घेण्यात येईल सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्या शाळेत एखादा अस्पृश्य वर्गातील विद्यार्थी आला तर संभावित गृहस्थाप्रमाणे आदरपूर्वक वागवून त्याला शाळेत देण्यात यावे असा हुकूम काढण्यात आला.

३) मेडिकल अधिकाऱ्यांनी अस्पृश्यांना धर्मार्थ दवाखान्यातून कसे वागवावे याबाबत हुकूमः अस्पृश्यांना व स्पृश्यांना धर्मार्थ दवाखान्यात निरनिराळया तऱ्हेने वागविण्यात येऊन दवाखान्याच्या कंपाऊंडमध्ये येवू दिले जात नाही. सरकारी इमारती या काही कोणाला सॅन्टोरियम म्हणून दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना इतक्या तुच्छतेने वागवू नये. धर्मार्थ संस्था या गरीब लोकांच्याकरीता असून गरीब अस्पृश्यांना समतेने वागविण्यात यावे. एखादा रोगी स्पृश्य असो किंवा अस्पृश्य तो दवाखान्यात येताच सभ्य गृहस्थाप्रमाणे वागवून त्याची तपासणी करावी. एखादा ऑफिसर कितीही थकलेला असो त्याने नवा रोगी येताच त्यांची सोय करावी.

४) कोल्हापूर संस्थानातील रेव्हिन्यू ज्युडिशियल आदिक अधिकाऱ्यांनी संस्थानातील जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने समतेने वागविले पाहिजे.

५) अस्पृश्यता विटाळ मानावयाचे नाही सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हौसीस, सरकारी अन्नछत्रे, नदीचे पानवटे, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्य प्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही. असे वागविले नाही तर गाव कामगार तलाठी यांना जबाबदार धरले जाईल.

६) गुन्हेगार लोकांची हजेरी पद्धत बंद करण्याबाबत — चिफ पोलिस ऑफिसर इ. करवीर यांजकडून इलाखे मजकुरी गुन्हेगार जातीच्या लोकांची हजेरी दररोज पोलीस पाटलाकडे होते. यातील काही जातीची हजेरी बंद केली तरी अद्याप त्या ठिकाणी हजेरी घेण्यात येत. या हजेरीपासून त्या त्या जातीच्या लोकांची फार गैरसोय होते व इमानाचे धंदे करून पोट भरण्यास अडचण पडते ही सर्व अडचण दूर झाली पाहिजे यासाठी महार, मांग, रामोशी या जातीच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी.

७) वेठ—वरळा प्रतिबंध — जर महार लोकांनी आपली वतने रयताख्यात दाखल करावीत म्हणून अर्ज दिला असेल तर त्यांच्याकडून अर्जाच्या तारखेपासून वेठ—वरळा नोकरी घेण्याचे नाही. जर कोणी आपल्या मनगटाच्या जोरावर सदर लोकांना वेठवरळा करण्यास लावील तर त्यांना नोकरीतून पेन्शन न देता कमी केले जाईल.

८) गुन्हेगारी लोकांची हजेरी पद्धत बंद करणेबाबत — शिक्षा झालेल्या इसमांची मग तो गुन्हेगार, बिन गुन्हेगार, स्पृश्य, अस्पृश्य कोणत्याही जातीचा असो शिक्षा संपल्या तारखेपासून पुढे ५ वर्षे वर्तवणूक चांगले आहे असे तो इसम दाखवून देईल तर त्याची हजेरी बंद करण्यात यावी. गटेचोर जातीच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी.

९) राजर्षी शाहू यांनी शाळांमधून अस्पृश्यतेचे उद्धार केले. अस्पृश्यांमध्ये महार, मांग, चांभार, ढोर या जाती होत्या. संस्थानात त्यांची लोकसंख्या एक लाखाहून जास्त होत. सन १९०७ साली अस्पृश्य शाळांची संख्या १६ व ४१६ विद्यार्थी होती. १९१२ साली शाळांची संख्या १८ विद्यार्थी संख्या ६३६ होते. स्वत: शाहू महाराज १९०६ च्या आदेशाने अस्पृश्यांसाठी रात्रीची शाळा कायम केली. १९०७ साली अस्पृश्यांच्या मुलींच्या शाळेस मंजुरी दिली. १९०९ च्या आदेशात महाराज म्हणतात की, ''सर्व मागासलेल्या लोकांची स्थिती सुधारण्यास विद्या प्रसाराशिवाय दुसरे साधन नाही. एक वर्षाच्या अनुभवावरून या लोकात विद्या शिकण्याची पात्रता आहे. अशी साक्ष पटली आहे.'' अशा विद्या प्रसारासाठी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती देणे, त्यांना मोफत वहया पुस्तके देणे असे उपक्रम चालू ठेवले. अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा बंद करून स्पृश्य अस्पृश्य मुलांची एकत्र शिक्षण घेण्यावर भर ठेवला. शाहू महाराजांनी सर्वधर्म समभावाचा धडा शिकविले. आर्य समाजातील स्वामींचा उपयोग करून घेऊन आपल्या पद्धतीप्रमाणे त्यांना आर्य करून घेऊन उपनयन केले. प्रथमच त्यांनी वेदांची संथा दिली. अस्पृश्यांच्या मुलांना वेदांची संधी देणारा हिंदूस्थानातील पहिलाच राजा होता. जून १९१९ रोजी त्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला लिहिले की, ''मागास वर्गीयांना, दारिद्रयाच्या आणि दु:खाच्या चिखलातून बाहेर काढणे हे माझे पवित्र कार्य आहे, माझे पवित्र कर्तव्य आहे. हे माझे पवित्र कर्तव्य करण्यात मी मागासवर्गीयांचीच सेवा करतो असे नाही तर ती मानवजातीची करतो अशी पवित्र भावना आहे.'' शाहू महाराजांच्या अस्पृश्योद्धाराच्या कामाविषयी धनंजय कीर म्हणतात, ''शाहूंच्या या अलौकिक प्रेमामुळे व निष्ठेमुळे त्यांना मागासवर्गीय व अस्पृश्य मानलेले वर्ग त्यांना देवासमान मानत होते. गौतम बुद्ध, फुले, आंबेडकर यांना ते जसे पुजनीय मानीत तसेच शाहुंना ते उद्धारकर्ता म्हणून पूजनीय मानीत.'' महाराजांच्या मनात अस्पृश्यांच्या विषयी कळवळ होता. कारण त्यांना हीन पद्धतीचे चित्रण जगावे लागत होते. लाचारीने वागावे लागत होते. अपमानास्पद जीवन जगावे लागत असे. वारंवार अत्याचाराला अन्यायाला बळी पडावे लागत होते. हे बदल शाहू महाराजांना बदलायचे होते.

अस्पृश्यांच्या उच्च शिक्षणासाठी कोल्हापूर, नागपूर, पंढरपूर, नाशिक येथे वसतिगृहे काढली. अस्पृश्य वर्गासाठी अस्पृश्यातून सुशिक्षित आणि सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत या उद्देशाने १४ फेब्रुवारी १९०८ रोजी अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसार करणारी मंडळी या संस्थेच्या व शाहूंच्या प्रेरणेने मिसक्लार्क हॉस्टेल कोल्हापूरात स्थापन केले तर सोनार समाजासाठी २४ डिसेंबर १९०८ रोजी देवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग कोल्हापूरात काढले. १८ मार्च १९१८ रोजी आर्य समाज गुरूकुल अस्पृश्यांच्या निर्मूलनासाठी काढले तसेच ढोर—चांभार बोर्डिंग १ जानेवारी १९१९ रोजी स्थापन केले. नाभिक विद्यार्थी वसतिगृह २४ जुलै १९२१ रोजी कोल्हापूरात रंकाळा येथे झाले. सुतार बोर्डिंग ६ जून १९२१ रोजी काढले. देवांग समाजासाठी श्री देवांग बोर्डिंग गंगावेशात काढले. नाशिक येथे १९२० च्या आसपास वंजारी समाज वसतिगृह काढले. १९००—१९०८ या कालखंडात दलित लोकांना चांगले दिवस यावेत म्हणून कर्मवीर विठ्ठल शिंदे यांच्या दि प्रेस क्लासेस मिशनची एक शाखा नागपूर येथे काढली. या शाखेच्या वतीने नागपूरच्या पाचपावली विभागात वसतिगृह चालविण्यात येत असे त्यालाच चोखामोळा वसतिगृह म्हणतात. तसेच पंढरपूर येथे एक अस्पृश्य वसतिगृह काढले. नागपूर हे अस्पृश्योद्धाराचे केंद्र मानले जाते. मे १९२० साली राजर्षींच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद झाली. या परिषदेमुळे आपला उद्धार आपणच केला पाहिजे याची सत्यता अस्पृश्यांना पटली. 'मागासलेल्यांचा कैवारी' आणि 'पददलितांचा उद्धारक' म्हणून राजर्षीचा गौरव करीत होते. आपल्या अध्यक्ष भाषणात शाहू महाराज म्हणतात की, ''माझे राज्य आहे, आपले छोटेसे पण तेथे सरकारी नोकरीत व सार्वजनिक मानांच्या जागांवर अस्पृश्यांना काम करण्याची संधी देण्यात आली आहे. एक अस्पृश्य तर म्युनिसिपल कमिटीच्या चेअरमनपदी विराजमान झाला आहे. संधी मिळाली तर अस्पृश्य देखील स्वकर्तृत्वाच्या उच्च पदावर जावू शकतात. भीमराव आंबेडकर हे तुमचे महान नेते आहेत. त्यांचे आदर्श डोळयासमोर ठेवा. त्यांचे अनुकरण करा त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न करा मी तर तुमच्या सेवेला वाहून घेतले आहे. मला तुमची सेवा करून द्यावी. ही प्रार्थना.'' राजघराण्यातील मोटार गाडयांवर लोकांची नेमणूक केली. शाहू महाराजांच्या इच्छेनुसार अस्पृश्यांनी भोसले, माने, मोरे, शिंदे, शिर्के, कदम, पवार, गायकवाड, सरदेसाई, नलावडे, साठे, आठवले, आचार्य, किर्तने अशी मराठमोळी आणि ब्राह्मण वळणाची आडनाव धारण केले की आडनावरून जातीचा बोध होतो आणि लोक अस्पृश्यांकडे हेटाळणी नजरेने पाहतात, म्हणून अस्पृश्यांनी नवीन आडनावे धारण करावीत असा शाहूंचा सूर होता. अस्पृश्यांना न्याय दिला पाहिजे असे ठणकाहून सांगणारे आणि त्यांच्या हितासाठी अनेक शैक्षणिक योजना राबविणारे राजर्षी हे खरेखुरे दलित मित्र होते. राजर्षी शाहू महाराज थोर मनाचे राजे होते.

**संदर्भ ग्रंथ**

१) बगाडे दत्तात्रय — छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि कायदे कानून, पद्मा प्रकाशन, कोल्हापूर १९८२.
२) साळुंखे नानासाहेब — शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हूपर २००६.
३) भोसले एस. एम. — राजर्षी शाहू विचार आणि कार्य, कोल्हापूर जिल्हा परिषद,कोल्हापूर १९७५.
४) जाधव बी.बी. — राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, १९७१.
५) कीर धनंजय — शाहू छत्रपती: एक क्रांतीकारक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,जानेवारी १९७६.